॥ हे हिन्दु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः स्वा. वि. दा. सावरकर
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

हे हिंदु शक्ति संभूत दिप्तिसम तेजा
हे हिंदु तपस्यापूत ईश्वरी ओजा
हे हिंदु श्री सौभाग्यभूतीच्या साजा
हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा ॥ धृ. ॥

जरी हिंदु राष्ट्र हे तुटे, वंदना
करी अंतःकरण तुज अभिनंदना
तव चरणी भक्तिच्या चर्ची चंदना
गूढ आशा पुरवी दान कपुषकतोज्या ॥ १ ॥

ही शुध्दी हृदाची रामदास शिर डुलवी
ही बुध्दिपाच शाह शत्रुच्या झुलवी
जी युक्ती कूटनितीस खलासि बुडवी
जी शक्ती बलोन्मतास पदतली तुडवी ॥ २ ॥

ती शुध्दी हेतुची कर्मी, राहू दे
ही बुध्दी भाबड्या जिवा, लाऊ दे
ती शक्ती शोणिता माजि वाहू दे
दे मंत्र पुन्हा तो दिला समर्थे तुज ज्या ॥ ३ ॥

तपस्यापूतः तपस्या करून प्राप्त झालेला
ओजाः सुव्यवस्था
भूतिः जन्म/ मोठेपण
साजः दागिना
चर्चीः लावणे
हृदाचीः हृदयाची
बुद्धीपाचः बुद्धीबळातली चाल

शोणितः रक्त